# महाराष्ट्र शासन

## कृषि व पणन विभाग भाजीपाला हस्तक्षेप योजना-२०१३

### रास्त दरात भाजीपाला विक्री केंद्र सुरु करण्याबाबतची कार्यप्रणाली

१) रास्त दरामध्ये भाजीपाला विक्री केंद्र सुरु करण्याकरीता मुंबई कृषिउत्पन्न बाजार समितीच्या मुख्य कार्यालयामध्ये टोल फी क्रमांक १८००२२२२१४ व हेल्पलाईन क्रमांक २७८८१४०० सुरु करण्यांत आलेला आहे.

२) टोल फ्री अथवा हेल्पलाईनवर सामाजिक संस्था/सहकारी संस्था/सामाजिक ट्रस्ट/बचतगट/सह.भांडार/व्यक्ती/समूह यांचे फोन आल्यानंतर त्याची रजिस्टरमध्ये नोंद घेण्यांत येते व रास्त दरात भाजीपाला विक्रीबाबतची माहिती देण्यांत येते.

३) रास्त दरात भाजी विक्री केंद्र सुरु करण्याकरीता संबंधितास अर्जाचा नमुना दिला जातो.

४) रास्त दरात भाजी विक्री सुरु करावयाचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर मुंबईतील तीन विभाग अधिका-यांकडे देण्यांत येतो. सदर अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणास भेटी देऊन जागा उपलब्ध असल्याबाबत खात्री झाल्यानंतर सदरचा अर्ज त्या विभागातील अधिका-यांच्या शिफारशीसह बाजार समितीकडे जमा केला जातो.

५) केंद्र सुरु करण्याच्या अर्जानुसार संबंधित विभागातील कर्मचारी सदर अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणास भेट देवून जागा उपलब्ध असल्याबाबात खात्री झाल्यानंतर सदरचा अर्ज त्यांच्या शिफारसीसह बाजार समितीकडे जमा केला जातो.

६) सदरच्या अर्जावर सुकाणू समितीमध्ये चर्चा करुन केंद्र सुरु करण्याबाबतची कार्यवाही करण्यांत येते.

७) संबंधित केंद्रांना त्यांची मागणी नोंदवण्याबाबत कळविण्यांत येते. नोंदणीबरोबर त्या दिवसाचे रास्त दरात भाजी विक्री केंद्रावर घोषित केलेल्या दरानुसार रक्कम भरण्याबाबत सुचित करण्यांत येते.

८) मागणीनुसार भरणा केल्यानंतर दुस-या दिवशी भाजीपाला पुरवठा संबंधीत केंद्रावर वाहनाद्वारे करण्यांत येतो.

९) सदर वाहनाबरोबर मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या एक कर्मचा-याची स्वतंत्र नेमणूक करण्यात आली असून सदर कर्मचारी भाजी विक्री केंद्र बंद होईपर्यंत त्या ठिकाणी हजर असतो.

१०) भाजीपाला पुरवठा बाजार समितीने उपलब्ध करुन दिलेल्या क्रेटसमधून करण्यांत येतो.भाजीपाल्याची खरेदी ही घाऊक भाजीपाला व्यापारी महासंघाकडून करण्यांत येते व पुरवठा सुध्दा महासंघाकडून करण्यांत येतो.

११) केंद्रावरील रिकामे झालेले क्रेटस दुस-या दिवशी अथवा त्याच दिवशी त्या वाहनामधून परत आणले जातात.

## भाजीपाला बाजार हस्तक्षेप योजना- २०१३-२०१४

## रास्त दरात भाजीपाला विक्री केंद्र सुरु करण्यासाठी करावयाचा अर्ज

प्रति,
मा.अप्पर आयुक्त तथा सचिव,
मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई,
प्रशासकीय इमारत, तिसरा मजला,
तुर्भे, नवी मुंबई.

विषय:- शासनाने जाहीर केलेल्या रास्त भाजीपाला विक्री योजनेत सहभागी होणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आमची संस्था रास्त भाजीपाला विक्री केंद्र ''ना नफा ना तोटा'' या तत्वावर चालू करु इच्छिते. तरी आपण नमूद केलेल्या खालील अटी/शर्ती आम्हास मान्य आहेत.

१) कृषि उत्पन्न बाजार समितीने निश्चित केलेल्या पुरवठादारामार्फत भाजीपाला आमचे खालील केंद्रावर माल प्लॉस्टीक क्रेटमध्ये पुरविला जाईल.

----------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

२) शासनाने निश्चित करुन दिलेल्या दरानुसार होणारी मालाची रक्कम पुरवठादारास रोखीने देण्याची आमची तयारी आहे. त्याबाबत त्यांना लेखी स्वरुपात पावती देण्यात येईल.

३) भाजीपाल्याची विक्री मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीने कळविलेल्या दरानेच अथवा त्यापेक्षा कमी दराने केली जाईल. कोणत्याही परिस्थितीत कळविलेल्या दरापेक्षा जास्तीत जास्त दराने विक्री होणार नाही.

४) आमचेकडे प्राप्त झालेला भाजीपाला शिल्ल्क राहिल्यास त्याची जबाबदारी आमच्या संस्थेवर राहील. कोणत्याही परिस्थीतीत याबाबत आर्थिक भरपाई मागणार नाही.

५) भाजीपाल्याची विक्री ग्राहकांना केली जाईल. कोणत्याही परिस्थितीत छोटे व्यापारी/हॉटेल चालक यांना माल विकला जाणार नाही.

६) महाराष्ट्र शासनाचा फलक विक्री केंद्रावर दर्शनी भागामध्ये लावण्यात येईल.

७) भाजीपाल्याचे दर विक्री केंद्रावर ठळक दर्शनी भागामध्ये लावण्यात येतील.

८) रोजच्या रोज प्लॅस्टीक क्रेट परत पुरवठादाराकडे देण्याची जबाबदारी आमच्या संस्थेवर राहील.

९) आमचे संस्थेच्यावतीने केंद्राचे कामकाज चालविणे,पुरवठादारास मालाचे पैसे देणे, प्लॅस्टीक क्रेटची सुरक्षितता व इतर सर्व बाबीसाठी जबाबदार असणा-या व्यक्तीचे नांव -------------------------- ------------------असून त्याचा भ्रमणध्वनी क्रमांक --------------------असा आहे.

तरी या योजने अंतर्गत आमचे संस्थेची निवड करुन त्वरित भाजीपाला पुरवठा चालू करावा, ही नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(----------------)